प्रसूतिपूर्व गर्भलिंग निदान कायदा ( PCPNDT) ॲक्ट १९९४ च्या कायद्यांतर्गत प्राप्त होणा-या अनुषंगाने करावयाची कार्यवाही

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

## शासन निर्णय क्रमांकः प्रचिनी-२०१६/प्र.क्र. ४७८/कु.क.

१० वा मजला,बी विंग, गो.ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, लो.टि. मार्ग, मुंबई - ०१
तारीख: ३१ मे, २०१७

**वाचा -**

1) **शासन निर्णय क्रमांकः प्रचिनी-२०१६/प्र.क्र.४७८/कु.क, दि. १८ ऑगस्ट, २०१६**
2) **अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र. राकुकका/पीसीपीएनडीटी (Standard Operating Procedure- SOP)/ कक्ष- ८ ड/न.क्र. ८४८४०-४२/२०१६, दि. २३ डिसेंबर, २०१६**

**प्रस्तावना -**

संदर्भ क्र. १ अन्वये पीसीपीएनडीटी ॲक्ट अंतर्गत प्राप्त होणा-या तक्रारींवर पुढील करावयाच्या कार्यवाहीबाबत नेमकी कार्यप्रणाली तयार करण्याकरीता समिती गठीत करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये अतिरिक्त संचालक, पुणे यांनी सदर समितीने याबाबतची कार्यप्रणाली निश्चित करून शासनास अहवाल सादर केला आहे. सदर अहवाल विचारात घेता प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा ( PCPNDT Act) ,१९९४ च्या संदर्भात येणा-या तक्रारींच्या अनुषंगाने पुढे कशा प्रकारे कार्यवाही करावी, ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन पुढील निर्णय घेत आहे.

## शासन निर्णय-

प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा (PCPNDT Act ), 1994 च्या संदर्भात प्राप्त तक्रारींवर आवश्यक ती कार्यपद्धती अवलंबण्याबाबत सोबत जोडलेल्या परीशिष्टातील मराठी व इंग्रजी पुस्तिकेतील दिलेल्या मार्गदर्शन सूचनांनुसार कार्यवाही करण्यास शासन मान्यता देत आहे.

हे आदेश प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान कायदा (PCPNDT Act), १९९४ ( सुधारीत कायदा २००३ ) मधील तरतूदी आणि विषयांकित प्रकरणी आकृष्ट होणारे केंद्र व राज्य शासनाचे वेळोवेळी निर्गमित झालेल्या आदेशांच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201705311543005717 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Tulshiram Murlidhar Shinde

Digitally signed by Tulshiram Murlidhar Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2b0114e3eb1e0ea81b74f3b5797e6c0f539d6318f719dfc9ee641eb1cc34c716, cn=Tulshiram Murlidhar Shinde
Date: 2017.05.31 16:00:53 +05'30'

**(तु.मु.शिंदे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

1. मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, मंत्रालय, मुंबई
2. मा. राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, मंत्रालय, मुंबई
3. सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, निर्माण भवन, नवी दिल्ली
4. आयुक्त ( आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
5. संचालक, आरोग्य सेवा, आयुक्तालय, आरोग्य भवन. मुंबई
6. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा कुटुंब कल्याण, पुणे.
7. जिल्हाधिकारी (सर्व)
8. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
9. उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
10. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, (सर्व)
11. वैद्यकीय अधिकारी, मनपा/नपा/नगर परिषद (सर्व)
12. वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय /उप जिल्हा रूग्णालये (सर्व)
13. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
14. निवडनस्ती (कु.क)

223

# Standard Operative Revised Guidelines for District Appropriate Authorities

## Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques (Prohibition of Sex Selection) Act, 1994

225

# INDEX


| Sr. No. | Contents | Page Number |
|---|---|---|
| 1 | Guidelines for registration of centre | 1 to 5 |
| 2 | Guideline for Demonstration of USG Machine | 6 to 7 |
| 3 | Guidelines Regarding Display of Notice/ Certificate | 8 |
| 4 | Guideline for Record Keeping | 9 to 10 |
| 5 | Guidelines for Maintenance of Inventory | 11 to 12 |
| 6 | Guidelines regarding New Procedure or New Rule or Implementation of New Proposal | 13 |
| 7 | Functions of the Appropriate Authorities | 14 |
| 8 | Clarifications about Advisory Committees | 15 |

## 1. Guidelines for registration of centre

Section 18(1) of the PCPNDT Act states that "No person shall open any Genetic Counselling Centre, Genetic Laboratory or Genetic Clinic including clinic, laboratory or centre having ultrasound or imaging machine or scanner or any other technology capable of undertaking determination of sex of foetus and sex selection or render services to any them after the commencement of the Pre-natal Diagnostic Techniques (Regulation and prevention of misuse) Amendment Act, 2002, unless such centre, laboratory or clinic is duly registered under the Act."

The registration is binding on government and semi government institutions, whether privately or publicly owned. There is no exemption for any institution on the grounds of it being under Central, State or Local Government or on the basis of it being a charitable or cooperative organization or any other grounds.

The applicant has to submit an application in duplicate in the prescribed from A to the appropriate authority along with the necessary fees. The acknowledgement shall be given to the applicant.

Applications doctor should submit Copy of Certificates, Latest MMC Registration Certificate, Affidavit, Copy of any one of the Identity cum Address Proof like Aadhar Card, Passport, MMC ID Card etc. Documents to Appropriate Authority.

Owner also submits Affidavit, Identity cum Address Proof as above only if the Owner is not Doctor from the above as documents.

Regarding the place the applicant should submit following documents Agreement for Sale, or Leave and Licence Agreement, or Lease Agreement, or Letter from Builder or Letter from the Society and Simple Line Diagram of the Layout of the Place with marking of the Placement of the Machine.

The registration certificate for the place should be issued initially without Machine Details as it is required at the time of placing order and before Delivery of the Machine. Once the Machine is ready for Delivery, the Machine Make, Model and Serial Number should be appended/entered in the Certificate)

As per code of conduct for AA rule 18 A the appropriate authority shall grant registration or communicate rejection within 70 days of from the date of receipt of the application.

**1.1 Guideline for renewal of the centre**

The application can be taken at least 30 Days in advance from the date of expiry of the present Certificate. The date of validity of renewed Registration Certificate will be effected in continuity of the date of expiry of the current certificate irrespective of the date of issue of the Renewed Registration Certificate. However, if the Renewal Certificate is issued after the validity date of the current Registration Certificate, then the validity will start from date of issue of the Renewed Certificate. Copy of Current Certificate, Prescribed Fees, Latest Maharashtra Medical Council Certificate, should be submitted with renewal application from A.

As per code of conduct for AA rule 18 A in the event of failure of the appropriate authority to grant renewal of registration or communicate rejection within 70 days of from the date of receipt of the application, it shall be deemed that registration has been renewed.

DEEMED RENEWAL: Renewal will be considered as Deemed Renewal if the applicant is not informed of reason for the rejection within 70 days of the application.

**1.2. Guidelines for Addition/ Deletion of Doctor / Machines/Place**

As per Rule 13substituted by G.S.R. 109 (E) dated 14/2/2003 (W.e.f 5/6/2012), It is said that "every Genetic Counsel Centre/ Genetic Laboratory or Genetic Clinic shall intimate every change of employee, place, address and equipments installed, to the Appropriate Authority (at least 30 days in advance of the excepted dateof such change and seek re- issuance of certificate of registration from the Appropriate Authority, with the change duly incorporated)".

**1.3. Addition/ Deletion of Doctor in registered centre**

The owner of the clinic as well as the doctor whose name has to be included will have to submit an application for addition of the name.

22e

The necessary documents for addition of new doctor's name are as follows.

1. Joint Application of the Owner and the Doctor
2. Affidavit of the Doctor whose name has to be added
3. Copy of the Qualification Certificate
4. Copy of the latest MMC Registration Certificate
5. Any one of the ID cum Address Proof of the Doctor – Aadhar Card or Passport or MMC issued I Card or any other Valid Photo ID cum Address Proof
6. Copy of the PCPNDT Registration Certificate.
7. Original Certificate for the necessary changes. A certified copy of the Certificate should be issued to the Owner for records till the original is returned.

For Deletion of Doctors name application should be submitted to Appropriate Authority by the doctor and the owner. (Owner should submit separate application)

Required documents to be submitted for deletion of name of doctor are as follows.

1. Application of the Doctor whose name has to be deleted with acknowledgement from owner
2. Application of the Owner
3. Copy of the Registration Certificate
4. Original Certificate for the necessary changes. A certified copy of the Certificate should be issued to the Owner for records till the original is returned.

**1.4. Addition / Deletion of Machine**

The owner should submit an application for delivery of machine in registered premises. The details of machine e.g. make, model, serial Number shall be entered in the registration certificate.Following are the documents required for addition of machine.

1. Application of the owner for addition of machine
2. Copy of the Invoice
3. Copy of the Registration Certificate of the Seller
4. Copy of the Registration Certificate of the Owner
5. Original Certificate for the necessary changes. A certified copy of the Certificate should be issued to the Owner for records till the original is returned.

If the owner wants to delete the machine (sale of machine) from registered centre he should submit an application for deletion with all the details of the machine to the Appropriate Authority.Further Appropriate Authority should issue no objection certificate cum certificate of deletion of machine from registration certificate. The sold machine should be physically remove from the registered premises within 7 days of receipt of no objection certificate cum certificate of deletion of machine. Following are the documents required for deletion of machine:-

1. Intimation Letter of Sale of Machine
2. Application for Deletion of Machine
3. Copy of the Sale Letter
4. Copy of the Registration Certificate of the Seller
5. Copy of the Registration Certificate of the Purchaser
6. Copy of Photo ID cum Address Proof of the Purchaser
7. Original Certificate of Seller for the necessary changes. A certified copy of the Certificate should be issued to the Owner for records till the original is returned.
8. Delivery Challan cum Letter of Possession by the Purchaser should be submitted within 7 days of the Delivery of the Machine to the purchaser.

**1.5. Change in Place**

The owner of the clinic as well as the doctor should submit an application mentioning the change of place and details of new address.

The necessary documents for change of place are as follows.

1) Application of the Owner.

239

2) Copy of the PCPNDT Registration Certificate.
3) **Place :** Proof of the Address of the Place of Registration like 1) Agreement for Sale, or 2) Leave and Licence Agreement, or 3) Lease Agreement, or 4) Letter from Builder or 5) Letter from the Society etc.
4) Simple Line Diagram of the Layout of the Place with marking of the Placement of the Machine.

Whenever there is change in place/person/equipment is effected then no new registration certificate is to be given. Also no Fees is chargeable.

## 2. Guideline for Demonstration of USG Machine

There is no provision in Act regarding demonstration of machine however, MOHFW; Government of India via GR dated 14th May, 2015 (No. V.11011/05/2013-PNDT.) Has provided clarification for procedure to follow demonstration / display of ultrasound / imaging machines. For display in a scientific exhibition the organizing body should take permission from the District Appropriate Authority specifying the details of the machine. District Appropriate Authority should ensure that these machines are not used for live demonstration and the organizing body has to take all responsibilities for any violation under PCPNDT Act.

- District Appropriate Authority may grant permission for education / training or display of diagnostic technologies as prescribed below.

  1) For display at scientific exhibition, the organizing body should take permission from the District Appropriate Authority for the display of diagnostic technologies / equipment specifying their details. DAA should ensure that these diagnostic technologies are not used for live demonstration and the organizing body has to take all responsibilities for the violations under the PC & PNDT Act, 1994, if any.

  2) For live demonstration at workshops and conferences, permission should be granted only when these diagnostic technologies are demonstrated in registered facilities under the PC & PNDT Act, 1994 with transmission facility for viewing by the delegates. Along with the request by the organizing body the details of the diagnostic technologies / equipment used in the workshops / conferences and list of experts / professional demonstrating technologies along with qualifications must be submitted. The registered facility that provides its premises for same should also intimate to their respective District Appropriate Authority with all information pertaining to the equipment used and experts / professional demonstrating technologies. In all live demonstration and conferences Appropriate Authority should ensure that all the record under the provision of the PC & PNDT Act are maintained and preserved.

     Documents required while submitting the application regarding demonstration are as follows:-

     1. Application of the Vendor / Company

2. Application of the Owner
3. Copy of the Registration Certificate of Vendor / Company
4. Copy of the Registration Certificate of the Clinic

For demonstration of machine at registered centre similar procedure should be followed like mentioned above in para 2 like request form the centre, details of the machine and record keeping under the provisions of the act.
No fees shall be charged for permission to demonstration.

# 3. Guidelines Regarding Display of Notice/ Certificate

All the notices / registration certificate of the doctors and the copy of Act book should be available in clinic. Display a notice should be put up prominently in waiting room and sonography / examination room of the clinic. Displaying notice board format should be maintained as per circular. The notice should be in two languages-One in Marathi and Second in English. Size, Colour and Font of the notice should be such that it can be read easily at a distance of three feet.A display notice of routine timing of availability of the individual doctors should be displayed in waiting the room. Certificate of PCPNDT Registration should be displayed in waiting room and examination room. Machine registration number (MRC) should be displayed on the sonography machine and certificate should be made available for inspection on demand. Latest / amended copy of PCPNDT Act should be made available in above mentioned two languages and on demand should be made available to the patient.

# 4. Guideline for Record Keeping

**4.1) Register to be maintained as per Rule 9(1)**: -5 Column Register should be filled up for the all the patient whose form 'F' has been filed while doing the obstetric Sonography. (Format Attached).If the date of first examination in the same clinic is not available or cannot be confirmed for any reason, then the date of present examination should be entered. 5 Column register should always be updated and register should be numbered in monthly repetitive pattern.Number of the Entries in 5 Column Register should be equal to the number of patients reported in the Monthly Report.

**4.2) Records of documents to be maintained by registered sonography centre as per Rule.**

As per Section 29 it clearly mentioned all other document required to be maintained under this Act & AA has powered to search and seize record as per Section 30 and it is mentioned in that AA examine any record, register, document, book, pamphlet, advertisement or any other material object.

**4.3) Referral / Requisition Letter**:-The format of the referral slip is not given in the act. However a requisition slip from the referring doctor is required for Obstetric Sonography that is sonography for evaluation of Gestation Sac / Embryo / Fetus. All the documents in single or combined form which can prove Identity and Address of the referring doctor's name and/or designation should be preserved.Indication for the study should be mentioned on the referral slip. In cases where the indication is not mentioned on requisition slip, to avoid hardship to the patient, the doctor performing the sonography examination should use his/her clinical judgment and mention the indication in Form F. In such cases, the doctor performing the Sonography Examination should also make note of non availability of the indication on the requisition slip and sign it. In situations, where patient is not able to produce requisition slip of a referring treating doctor, the doctor performing the sonography keep notes for the reason for doing sonography i.e. "Self Referral". Such requisition slip should be signed by the patient also. Clinical note/record must be kept by Radiologist it should be maintained.

**4.4) Information to Be Collected from Clinics**: - All the relevant data pertaining to Obstetric Sonography of a Pregnant Patient is filled in Form F and is submitted at the Online Portal of the Government of the Maharashtra. Any Statistical Analysis of Submitted Data should be procured by the Appropriate Authority from the Online Site.In case of any difficulty, or where such information is not available to the Appropriate Authority, the Online Site Administrator should be contacted by the Appropriate Authority through State Appropriate Authority. In cases where any information relevant to Obstetric Sonography is not submitted online, the Appropriate Authority can seek the information, in writing, from the Clinic. Written letter by the Appropriate Authorityshould be given to seek particular information from the sonography centres.

**4.5) Errors of Data Entry at Online Portal**: -All the information of the Form F should be submitted Online correctly and within the stipulated time frame. All efforts shall be made to minimize the errors. However, when some mistake or error happens in such case clinic Owner or Doctor should inform in writing and under stamped acknowledgement or by email within 24 hours to the concerned Appropriate Authority or Designated Authority and State Appropriate Authority clearly mentioning all the details of mistake or error. Reason for the error or mistake should also be mentioned wherever applicable. A copy of the such letter should also be sent by email on the email address provided on the Online Site. The error report should indicate Name of Patient, Date of Examination, Nature of Error, and the Correction needed. A print out of the sent email to AA and state PNDT cell should be filed along with the Form F of the particular Patient for record keeping and future reference. The documents required are as follows:-

1. Letter of Error/Mistake Reporting.
2. Stamped Acknowledgement of the Letter.
3. Email to the Online Site.
4. Printout of the email.

## 5. Guidelines for Maintenance of Inventory

### 5.1) Machine which can be kept in Sonography Centres:-

The Sonography Centres should have only those machines which have been endorsed in the registration certificate. In any case where a machine has been Sold or Transferred Out or Shifted Out or Disposed Off as Scrap, its entry should be deleted from the PCPNDT Registration Certificate. In case where a New Machine has been Purchased or Shifted In or Transferred In, its details should be entered in the PCPNDT Certificate. In this case the owner / doctor of centre should inform the AA. The appropriate authority shall take a note and update the details & endorse on Registration Certificate.

The documents required are as follows:-

1. Deletion of from Certificate the details of Machine that has been Sold or Transferred Out or Shifted Out or Disposed off.
2. Addition in Certificate the details of Machine that has been acquired by Purchase or Transfer or Shifting.

**5.2) Use of Portable Machines:** -As per Rule 3(B) provisions of regulation of portable machine are provided in PCPNDT Rule. A sonography machine needs to be registered in the Certificate of Registration. Such Portable Machine shall not be taken out of the Geographical Location of the Registered Premises of the Clinic or Hospital. In case of the Hospital, the machine can be used in any of the location of the Hospital Building, but cannot be used outside the hospital, but the hospital premises should be registered. In case of a Registered Mobile Unit, the Machine cannot be used outside the registered mobile unit. Portable machine of any make and model are permitted to be registered, but their use shall be limited within the registered premises/hospital. The documents required are as follow:-

1. Details of the Sonography Machine.
2. Details of the Geographical Location of the Registered Clinic or Hospital.
3. Details of the Mobile Unit.

**5.3) Sale of Ultrasound Machine from one Registered Centre to another Registered Centre: -**

Sale of Ultrasound Machine from one registered centre to another registered is possible as per GR Dated 01 July, 2016 शासन परिपत्रक क्र. प्रचिनी -२०१२/प्र.क्र. ३०५/कु.क. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई (to find GR please see website www.maharashtra.gov.in & their code no. is 201606241313416617 )

## 6. Guidelines regarding New Procedure or New Rule or Implementation of New Proposal

As per Rule 18(A) (9) it is mentioned that "All the Appropriate Authorities including the state, district and sub- district notified under the Act inter alia, shall observe the following conduct of accountability namely:-

1) Obtained prior sanction or approval of the Government of India for any resolution concerning the implementation of the provision of the Act.

2) Take action if any, required under the Act and immediately on receipt of the notice under clause (b) of sub section (1) of Section 28 of the Act and if he or she fails to do so shall not be entitled for the protection under Section 31 of the said Act and defend the case in his or her own capacity and at his or her own cost. "

Whenever any Appropriate Authority wants to make a new procedure or comes up with a new proposal, the same should be submitted to State Appropriate Authority for approval. A study report regarding need, validity and feasibility of the proposal shall be submitted to the State Appropriate Authority. The State Appropriate Authority shall put the proposal with its observations to the State Advisory Board and State Supervisory Board for approval. On approval from the State Advisory Board and State Supervisory Board, the proposal shall be submitted to the Central Supervisory Board and Central Advisory Board for approval. On approval of the Central Supervisory and Central Advisory Boards, the proposal shall be uniformly implemented in the whole state by issuing a Government Resolution senctioned by Governor and published in the State Gazette.

# 7. Functions of the Appropriate Authorities

a) to grant, suspend or cancel registration of a Genetic Counselling Centre, Genetic Laboratory or Genetic Clinic.

b) to enforce standards prescribed for the Genetic Counselling Centre, Genetic Laboratory and Genetic Clinic.

c) to investigate complaints of breach of the provisions of this Act or the rules made thereunder and take immediate action and

d) to seek and consider the advice of the Advisory Committee, constituted under sub- section(5), on application for registration and on complaints for suspension or cancellation of registration.

e) to take appropriate legal action against the use of any sex selection or pre-natal determination of sex.

f) to create public awareness against the practice of sex selection or pre-natal determination of sex.

g) to supervise the implementation of the provisions of the Act and rules.

h) to recommend to the Board and State Boards modifications required in the rules in accordance with change in technology or social conditions.

i) to take action on the recommendations of the Advisory Committee made after investigation of complaint for suspension or cancellation of registration.

**Powers of Appropriate Authority**

a) Summoning of any person who is in possession of any information relating to violation of the provisions of this Act or the rules made thereunder.

b) Production of any document or material object relating to clause (a)

c) Issuing search warrant for any place suspected to the indulging in sex selection techniques or pre-natal sex determination and

d) Any other matter which may be prescribed.

## 8. Clarifications about Advisory Committees

**Assistance to be rendered by the Appropriate Authority to the Advisory Committee:-**

1) Every meeting of the Advisory Committee shall be attended by the Appropriate Authority concerned.

2) All secretarial and other assistance to the Advisory Committee for the discharge of its functions shall be provided by the Appropriate Authority.

3) The Appropriate Authority shall issue the notice of meeting, agenda, notes on agenda and the minutes of the meeting, in consultation with the Chairman, subject to the provisions of Rules 5, 6, 7 and 12.

**Decisions on questions before the Advisory Committee:-**

1) The advice tendered by the Advisory Committee shall be adopted, and in the event of any difference of opinion amongst the members, the matter shall be put to vote and decided by simple majority of the members present.

2) The Appropriate Authority shall not have a right to vote.

3) In the event of tie in votes, the chairman or in his absence, the member presiding shall have a second or costing vote.

4) The fact of any question having been decided by the process of voting instead of by adoption shall be recorded in the minutes of that meeting of the Advisory Committee.

९३३ 283

# जिल्हा समुचित प्राधिकारी यांचेसाठी मानक कार्य मार्गदर्शक तत्वे

## गर्भधारणापूर्व आणि प्रसवपुर्व निदान तंत्रे (लिंग निवड प्रतिबंध) कायदा १९९४

## मराठी प्रत

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पान नंबर |
| --- | --- | --- |
| १ | पीसीपीएनडीटी कायद्याअंतर्गत समुचित प्राधिकारी यांचेकरीता आचारसंहिता. | १ ते ३ |
| २ | लिंग निवड करण्यास सक्षम उपकरणाबाबत. | ४ |
| ३ | जिल्हा सल्लागार समितीसंबंधी मार्गदर्शक तत्वे. | ५ |
| ४ | केंद्राची नोंदणी आणि नुतणीकरण करण्याची मार्गदर्शक तत्वे. | ६ ते ७ |
| ५ | केंद्र तपासणीकरीता मार्गदर्शक तत्वे. | ८ ते ११ |
| ६ | शोध आणि जप्ती प्रक्रिया. | १२ ते १३ |
| ७ | (डिकॉय ऑपरेशन) साठी मार्गदर्शक सूचना. | १४ ते १६ |
| ८ | तक्रारीस प्रतिसाद देण्यासंबंधिच्या मार्गदर्शक सुचना. | १७ ते १८ |
| ९ | फौजदारी गुन्हा/तक्रार दाखल करण्याकरीता मार्गदर्शक सूचना. | १९ ते २१ |
| | **प्रपत्रे व परिशिष्टे** | |
| १० | परिशिष्ठ १ - नमुना अ- नोंदणी व नुतनीकरण करण्यासाठी अर्ज. | २२ ते २५ |
| ११ | परिशिष्ठ २ - प्रतिज्ञापत्र. | २६ |
| १२ | परिशिष्ठ ३ - नमुना ब - नोंदणी प्रमाणपत्र. | २७ ते २८ |
| १३ | परिशिष्ठ ४ - नमुना एच- प्रसुतिपूर्व निदान तंत्रे (नियम आणि गैरवापरावरील प्रतिबंध) अधिनियम, १९९४ खाली नोंदणी प्रदान करण्याचे अर्ज मंजूर /नामंजूर अर्ज यांचे स्थायी अभिलेख ठेवण्याचा नमुना. | २९ ते ३० |
| १४ | परिशिष्ठ ५ - नमुना क - नोंदणी प्रदान / नुतनीकरण अर्ज फेटाळण्यासाठी नमुना. | ३१ |
| १५ | परिशिष्ठ ६ - पीसीपीएनडीटी कायदा १९९४ नुसार सोनोग्राफी केंद्राची तपासणी करिता तपासणी सुचीचा नमुना | ३२ ते ३६ |

2m



| अ.क्र. | विषय | पान नंबर |
| --- | --- | --- |
| १६ | परिशिष्ठ ७ - नमुना फ -अनुवंशशास्त्रीय चिकित्सालयाने /स्वनातीत चिकित्सालयाने/प्रतिमा केंद्राने गर्भवती महिलेशी संबधीत ठेवावयाच्या अभिलेखाचा नमुना. | ३७ ते ४१ |
| १७ | परिशिष्ठ ८ - नमुना ड- अनुवंशशास्त्रीय सल्लागार केंद्रांने ठेवावयाच्या अभिलेखाचा नमुना. | ४२ ते ४३ |
| १८ | परिशिष्ठ ९ - नमुना ई -अनुवंशशास्त्रीय प्रयोगशाळेने ठेवावयाच्या अभिलेखाचा नमुना. | ४४ ते ४५ |
| १९ | परिशिष्ठ १० - नमुना ग - संमती पत्राचा नमुना(इन्व्हेंजीव्ह तंत्रासाठी). | ४६ |
| २० | परिशिष्ठ ११ - कारणे दाखवा नोटीसचा स्वरुप नमुना. | ४७ |
| २१ | परिशिष्ठ १२- धाड आणि जप्ती प्रक्रियेसाठी मार्गदर्शक सुचना. | ४८ ते ५२ |
| २२ | परिशिष्ठ १३- प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात सादर करण्याच्या फिर्यादीचा स्वरुप नमुना. | ५३ ते ५५ |
| २३ | परिशिष्ठ १४- डिकॉय केस मध्ये सहभाग घेणाऱ्या गर्भवती स्त्रीचे विषेश प्रतिज्ञापत्र/ घोषणापत्र | ५६ ते ५८ |
| २४ | परिशिष्ठ १५- डिकॉय केस करताना करावयाच्या पंचनाम्याचा संक्षिप्त नमुना | ५९ ते ६० |
| २५ | परिशिष्ठ १६- डिकॉय केस करणेकरीता मार्गदर्शन सुचना. | ६१ ते ६२ |
| २६ | परिशिष्ठ १७- PCPNDT कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करताना वापरावयाची स्वरुप नमुना | ६३ ते ६५ |
| २७ | परिशिष्ठ १८- शोध आणि जप्ती संबंधित फौजदारी दंड संहितेमधील सामान्य तरतुदी फौजदारी दंड संहिता १९७३ नुसार सामान्य तरतुदी खालीलप्रमाणे | ६६ ते ६९ |

२०७

# १.पीसीपीएनडीटी कायद्याअंतर्गत समुचित प्राधिकारी यांचेकरीता आचारसंहिता

GSR.119 (E) गर्भधारणापुर्व व प्रसवपुर्व निदान तंत्र (गर्भलिंगनिवड प्रतिबंध) १९९४ (५७) १९९४ कायदयानुसार सुधारित अधिनियम ३२ अन्वये केंद्रशासनाने पीसीपीएनडीटी कायदयाची अंमलबजावणी करणेसाठी खालील सुधारित नियम बनविले आहेत.

१) सदर अधिनियमास (गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्रे (लिंग_निवड प्रतिबंध) अधिनियम,१९९४ (२०१४) २ असे संबोधले जावे. केंद्र शासन ज्या तारखेला अधिकृत राजपत्रात यासंबंधी अधिसूचना प्रसिध्द करेल त्या तारखेपासुन सदर अधिनियम लागू होतील.

२) गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्रे (लिंगनिवड प्रतिबंध) अधिनियम, १९९६ च्या नियम १८ अंतर्गत खालील नियम लागू करण्यात आलेले आहेत.

१८अ. - समुचित प्राधिकारी यांचेकरीता आचारसंहिता

*१) अधिकृत राजपत्रात प्रसिद्ध केल्याप्रमाणे राज्य, जिल्हा, उपजिल्हा स्तरावरील सर्व समुचित प्राधिकारी यांनी खालील आचारसंहितेचे पालन करावयाचे आहे.*

- कायम पत, प्रतिष्ठा व अखंडता कायम राखावी.
- कायदयाची अंमलबजावणी करताना संतुलित व मानकाप्रमाणे काम पहावे.
- काम पहाताना कोणताही पुर्वग्रहदुषित वा अपराधिपणाची भावना (Presumption of guilt) ठेवू नये.
- कोणत्याही व्यक्तीस त्याच्या लिंग, धर्म व जमातीनुसार खालच्या पातळीवरुन टिपण्णा करण्यापासून दूर रहावे.
- समुचित अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीत लिखीत प्रशासकीय आदेशाव्दारे प्रतिनिधी म्हणून प्राधिकृत नियुक्त करावे.

*२) कायदयाअंतर्गत सर्व राज्य, जिल्हा, उपजिल्हा अधिकृत समुचित प्राधिकारी यांनी सल्लागार समितीसंबंधीची पाळावयाची तत्वे –*

- सल्लागार समितीची स्थापना त्यांची कर्तव्ये व इतर संबंधित बाबी हे सल्लागार समिती नियम १९९६ नुसार करण्यात यावी.
- गर्भधारणापुर्व व प्रसवपुर्व निदान तंत्र (गर्भलिंगनिवड प्रतिबंध) १९९४ तपास यंत्रणेतील संबंधित व्यक्तींची सल्लागार समितीवर नियुक्ती करण्यात येवू नये.
- सल्लागार समितीतील रिक्त जागा वा रिक्त होण्यापूर्वीच ९० दिवस आधी भरती प्रक्रिया चालु करावी.
- एखाद्या व्यक्तीच्या हितसंबंधाबद्दल शंका असल्यास अशा व्यक्तीची सल्लागार समितीमध्ये सदस्य/ विधीसल्लागार म्हणून नियुक्ती करु नये.
- नोंदणीसाठीच्या अर्जावर किंवा नोंदणीसाठी निलंबित किंवा रद्द करण्यासाठी प्राप्त झालेल्या तक्रारीवर विचार विनिमय करण्यासाठी सल्लागार समितीच्या वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात याव्यात.

*३) कायद्याअंतर्गत सर्व राज्य, जिल्हा, उपजिल्हा अधिकृत समुचित प्राधिकारी यांनी तक्रार आणि तपास प्रक्रिया करण्यासाठीची तत्वे –*

- केस किंवा तक्रारीचे नोंदी बरोबरच त्याबाबतची दैनंदिनी जतन करावी.
- सर्व तक्रारींचा पाठपुरावा करताना पारदर्शकता बाळगावी.
- तक्रार दाखल झाल्यानंतर चोवीस तासाच्या आत सर्व तक्रारींचा तपास सुरु करावा आणि त्याचा निपटारा अठ्ठेचाळीस तासाच्या आत पुर्ण करावा.
- तपास कार्यात पोलिसांचा सहभाग शक्यतो टाळावा. कारण या कायदयानुसार ही प्रकरणे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या अंतर्गत १९७३ (२-१९७४) दाखल होतात.

*४) कायद्याअंतर्गत सर्व राज्य, जिल्हा, उपजिल्हा अधिकृत समुचित प्राधिकारी यांनी नविन नोंदणी आणि नुतनीकरण करण्यासाठीची तत्वे –*

- अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून ७० दिवसाच्या मुदतीच्या आत नूतनीकरण आणि नवीन नोंदणी अर्जाचा निपटारा करण्यात यावा.
- कोणताही नविन नोंदणी व नूतनीकरणासाठी अर्ज स्वीकारताना अर्जदार यांच्यावर न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे नाहीत याची खात्री करावी.

*५) कायद्याअंतर्गत सर्व राज्य, जिल्हा, उपजिल्हा अधिकृत समुचित प्राधिकारी यांनी कायदेशीर कार्यवाही करण्यासाठीची तत्वे –*

- साक्षीदाराचे संरक्षणाची व खर्चाची तजवीज नोंदणी रक्कमेतून होईल याची खात्री करावी.
- न्यायालयात प्रकरण दाखल करताना शासकीय अधिसूचना ह्या मुळप्रतित सादर होतील याची काळजी घ्यावी व त्याची साक्षांकित प्रत जतन करावी.
- न्यायालयीन प्रकरणे दाखल करताना सर्व कागदपत्रे, अभिलेख, स्टेटमेन्ट, पुरावा, पंचनामा इतर साहित्य वस्तु इ. बाबी मुळ प्रतीत दाखल झाल्याची खातरजमा करावी.
- सील, जप्तीची व कायदेशीर कारवाई करताना संबंधित केंद्राची नोंदणी निलंबित करावी.
- गर्भधारणापुर्व व प्रसवपुर्व निदान तंत्र (गर्भलिंगनिवड प्रतिबंध) १९९६ अंमलबजावणी करताना गर्भधारणा समाप्ती कायदा १९७१ (३४-१९७१) चे निर्दोष मुक्तता आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांपेक्षा जास्त उशीर करु नये. कायदयाचे उल्लंघन होणार याची काळजी घ्या.
- निर्दोष मुक्ततेच्या न्यायालयीन आदेशाच्या विरोधात ३० दिवसांच्या आत वरच्या न्यायालयात अपिल किंवा इतर कार्यवाही दाखल करावी.

*६) कायद्याअंतर्गत सर्व राज्य, जिल्हा, उपजिल्हा अधिकृत समुचित प्राधिकारी यांनी केंद्रशासनास त्रैमासिक प्रगती अहवाल सादर करावा व विहीत प्रपत्र "एच" मध्ये सर्व माहिती जतन करुन ठेवावी.*

*७) कायद्याअंतर्गत सर्व राज्य, जिल्हा, उपजिल्हा अधिकृत समुचित प्राधिकारी यांनी अल्ट्रासाऊंड उपकरणाची तपासणी करताना खालील बाबी पहाव्यात –*

- अल्ट्रासाऊंड उपकरणाचे बाबतीत खरेदी/ विक्री, आयात उपकरणे, जोडून तयार केलेले उपकरणे, भेटी दाखल मिळालेले) भंगार केलेले, प्रात्यक्षिकाकरीता वापरलेल्या उपकरणांचे देखरेख करावी.
- राज्यातील व जिल्ह्यातील नोंदणी न झालेल्या मशिनची माहिती काढण्यासाठी विक्री व वापरात असलेल्या मशीनचे नियमित सर्वेक्षण सर्व्हेक्षण करावे.
- ज्या मशीनची नोंदणी झालेली नाही अशा मशीन मालकांची व विक्रेत्याविरोधात तक्रार दाखल करावी.

८) कायद्यांतर्गत सर्व राज्य, जिल्हा, उपजिल्हा अधिकृत समुचित प्राधिकारी यांनी तपासणी व पर्यवेक्षण करण्याची नियमावली –

- नोंदणीकृत केंद्रांची दर ९० दिवसातून एकदा नियमित तपासणी करुन त्याची कागदोपत्री नोंद ठेवावी व त्याची एक पोचपावती केंद्राच्या मालकाकडे सुपूर्त करावी.
- तपासणी अहवाल तीन महिन्यातून एकदा सल्लागार समितीपुढे पाठपुरावा व कार्यवाहीसाठी ठेवावा.
- दाखल केलेली प्रकरणे, दोषी व्यक्ती, नोंदणी, निलंबित किंवा रद्द वैद्यकिय परवाने, केलेल्या तपासणी याचे दोन महिन्यांनी प्रगतीपर अहवाल जिल्हास्तरावर ठेवावे व त्रैमासिक प्रगतीपर अहवाल राज्यस्तरावर जतन करुन ठेवावे.

अ) दोषा आरोप निश्चितीची प्रत न्यायालयातून सात दिवसाच्या आत मिळवून डॉक्टरांबाबत माहिती सात दिवसांचे आत राज्य वैदयकिय परिषदेस सादर करावी.

ब) डॉक्टरांची दोषी म्हणून निवड झाल्याची न्यायालयीन आदेशाची साक्षांकित प्रत शक्य तितक्या लवकर मिळवून सात दिवसाच्या आत साक्षांकित प्रत राज्य वैदयकिय परिषदेस सादर करावी.

९) कायद्यांतर्गत सर्व राज्य, जिल्हा, उपजिल्हा अधिकृत समुचित प्राधिकारी यांचे उत्तरदायित्व –

- कायद्याची अंमलबजावणी संदर्भात कोणताही निर्णय घेण्यापूर्वी भारत सरकारची मान्यता घेण्यात यावी.
- नोटीस मिळाल्यानंतर या कायद्यान्वये जर कलम २८ (पोट कलम १) नुसार कारवाई केली नाही तर किंवा तसे करण्यास अपयशी ठरले तर ती किंवा तो कलम ३१ अन्वये संरक्षण मिळण्यास ती किंवा तो अपात्र ठरतील व त्यांना अशाप्रसंगी त्यांना स्वक्षमतेने व स्वखर्चाने बचाव करवा लागेल.

१०) कायद्यांतर्गत सर्व राज्य, जिल्हा, उपजिल्हा अधिकृत समुचित प्राधिकारी यांच्यासाठी आर्थिक मार्गदर्शक सूचना –

- सर्व पातळीवर दोन विद्यमान अधिकाऱ्यांच्या नावाने संयुक्त स्वतंत्र बँक खाते उघडावे.
- शासनाच्या आर्थिक मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन पारदर्शकतेने निधीचा विनियोग करावा.

## २) लिंग निवड करण्यास सक्षम उपकरणाबाबत

*उपकरणे विक्रीबद्दल (नियम ३ अ आणि ३ ब)*

(राज्य सरकार उत्पादकास कायदा पुरकपरिपत्रक जारी करु शकतात)

१. कायदयाच्या अंतर्गत नोंदणीकृत नसलेल्या केंद्रास विक्री किंवा अल्ट्रासाऊंड मशीन वापर करण्यास कायद्याने बंदी आहे. कोणत्याही अनधिकृत केंद्रास मशीन वितरण, पुरवठा, कर्जाने, भाड्याने देणे कायद्यानुसार प्रतिबंधित आहे. (कलम ३ब आणि नियम ३अ)

२. * कोणतीही व्यक्ती विक्रेता वा दुकानदार यांनी तीन महिन्यांनी मशीन विकत घेणाराची किंवा ग्राहकांची यादी त्या केंद्राच्या वा राज्याच्या समुचित प्राधिकाऱ्यास कळविणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. (कलम ३अ (२))

३. अशा मशीन खरेदी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस गर्भधारणापुर्व वा प्रसवपुर्व गर्भलिंग निदान करणार नाही असे प्रतिज्ञापत्र वा हमीपत्र सादर करणे कायद्यानुसार बंधनकारक राहील. (कलम ३ अ (३))

४. मशीन उत्पादक व विक्रेता यांनी मशीन विक्रीचा त्रैमासिक अहवाल निरंक असला तरी राज्य समुचित प्राधिकाऱ्यास सादर करणे बंधनकारक आहे.

५. मशीन उत्पादक वा विक्रेत्याने जुन्या मशीनची विक्री वा खरेदी बद्दल माहिती राज्य समुचित प्राधिकाऱ्यास देणे बंधनकारक आहे.

* व्यक्ती ही स्वतंत्र वा संघटीत असु शकते, वा एखाद्या मंडळाची सदस्य असु शकते.

*पोर्टेबल मशीनचा वापर करण्याबद्दल :-*

कोणतेही पोर्टेबल मशीन जे गर्भलिंग निदान करु शकते हे फक्त खालील प्रसंगात वापरण्यास परवानगी देता येते.

अ) ज्या आवारात या मशीनचा वापर करावयाचा आहे हे आंतररुग्णाच्या वापरासाठी नोंदणीकृत असावे. (केंद्राच्या मालकाने तसे फॉर्म अ मध्ये आवाराबाबत नमुद करावे आणि नेमक्या जागेचा उल्लेख फॉर्म ब मध्ये केलेला असावा)

ब) वैद्यकिय वा आरोग्याची सेवा देणारे फिरते पथक, जे बहुविध आरोग्य सुविधा पुरवितात जसे की उपचारात्मक, महिला बाल कल्याण, कुटुंब कल्याण, रोग निदान, तज्ञ अत्यावश्यक सुविधा पुरवितात.अशी पथके कायद्यानुसार परवानगीस पात्र ठरु शकतात.

## ३) जिल्हा सल्लागार समितीसंबंधी मार्गदर्शक तत्वे

*जिल्हा सल्लागार समितीकडुन कधी व कसा सल्ला घेता येईल (GSR540(E) दि. २६.११.१९९६)*

१. केंद्रास मंजुरी देणे, नुतनीकरण करणे, नोंदणी नाकारणे संदर्भात सल्ला देणे असेल.(कलम १९(१)(२)(३), नियम ६ (२) ३), नियम ८ (२) निलंबित वा रद्द करणे. १७(८) हे जिल्हा सल्लागार समितीचे मुख्यतः कर्तव्य असेल..

२. नवीन केंद्रास मंजुरी, नुतणीकरणास मंजुरी, केंद्र निलंबित वा रद्द करणे याबाबत चर्चा करणे व सल्ला देणे.(नियम ६(२)).

३. सल्लागार समितीची सभा कमीत कमी दर दोन महिन्यातुन/साठ दिवसातुन एकदा घेण्यात यावी. (नियम १५)

४. सभेची सुचना कमीत कमी सात दिवस आधी प्रत्येक सदस्यास कळवावी परंतु अत्यावश्यक वाटल्यास कमी मुदतीत सभा बोलाविण्यास हरकत नाही.

५. सल्लागार समितीत तीन वैद्यकिय तज्ञ त्यात स्त्री रोग व प्रसुती तज्ञ, बालरोग तज्ञ, अनुवंशीय तज्ञ, विधी सल्लागार, माहिती विभागातील राज्य शासनाचे अधिकारी, तीन समाजसेवक त्यातील किमान एक व्यक्ती महिला संघटनेशी निगडीत असावी.

६. प्रत्येक सभासदांची मुदत किमान तीन वर्षापेक्षा जास्त नसावी.

७. सल्लागार समितीतील एक सभासद अध्यक्ष असेल. (समुचित प्राधिकारी अध्यक्ष म्हणुन काम करणार नाहीत) (कलम १७(५))

८. प्रसवपुर्व तंत्र वा लिंग निदान किंवा लिंग निवड करण्याशी निगडीत असलेली व्यक्ती (ज्या व्यक्तीवर या संदर्भात न्यायालयात केस प्रलंबित असल्यास) सभासद म्हणुन नियुक्त करता येणार नाही. (कलम १७(७)).

९. कुठलीही व्यक्ती जिच्याविरोधात न्यायालयात गर्भधारणा पुर्व वा प्रसवपुर्व गर्भलिंग निदान अंतर्गत केस दाखल असेल तर सल्लागार समिती सदस्य म्हणुन नियुक्तीस पात्र असणार नाही.

१०.या कायद्याअंतर्गत तपास कार्यात निगडीत असणाऱ्या व्यक्तीस सल्लागार समितीची सभासद म्हणुन नियुक्त करता येणार नाही.(नियम १८ अ (२) (ii)

## ४) केंद्राची नोंदणी आणि नुतणीकरण करण्याची मार्गदर्शक तत्वे.

सर्व जनुकीय केंद्र, जनुकीय प्रयोगशाळा इत्यादी सुविधा केंद्रे जिथे लिंग निवड करता येण्याची शक्यता असते अशा सर्व केंद्राना कलम १८,१९ आणि नियम ४,५,६,७ अन्वये नोंदणी कराणे बंधनकारक आहे.

समुचित प्राधिकाऱ्याने आपल्या अखत्यारातील जनुकीय केंद्रे, जनुकीय प्रयोगशाळा, सोनोग्राफी मशीन वा तत्सम उपकरणे जी गर्भलिंग निदान वा निवड करण्यास सक्षम असणाऱ्या सर्व ठिकाणांची माहिती घेऊन त्यांची नोंदणी करणे कलम १८,१९ आणि नियम ४,५,६,७,८ अन्वये कायद्यान्वये आवश्यक आहे.

### केंद्राची नोंदणी कशी करावी ?

- समुचित प्राधिकाऱ्याने नोंदणीसाठी आलेले विहीत नमुना (Form A at annex 1 कलम १८(२) नियम ४ (i) आणि नियम ८(१)) अर्ज स्वीकारावेत.
- अर्जासोबत गर्भलिंग निदान, गर्भधारणा पुर्व वा प्रसवपुर्व भ्रुणाचे लिंग निदान करणार नाही व लिंग निदान करणेसाठी कोणतीही चाचणी वा पध्दती वापरण्यार नाही असे प्रतिज्ञापत्र जोडलेले असावे. (कलम ४ (२) अन्वये)
- नियम ५अ आणि ५ब नुसार अर्जाचे शुल्क समुचित प्राधिकाऱ्याच्या नावे डिमांड ड्राफटने समुचित अधिकाऱ्याच्या मुख्यालयातील बँकेसाठी खालीलप्रमाणे काढुन दयावा.

१. जनुकीय केंद्र, प्रयोगशाळा, जनुकीय चिकीत्सालय, सोनोग्राफी केंद्र, इमेजिंग सेंटरसाठी रक्कम २५,०००/- रुपये.

२. जनुकीय केंद्र, जनुकीय प्रयोगशाळा चिकीत्सालय, सोनोग्राफी केंद्रे वा संयुक्त केंद्रे एकत्रित काम करणारे रुग्णालय, नर्सिंग होम, संस्था यांचेसाठी रक्कम रुपये ३५,०००/-.

- समुचित प्राधिकाऱ्याने अर्ज नामंजुर केल्यानंतर ९० दिवसाच्या आत परत अर्ज दाखल केल्यास फी परत भरण्याची गरज नाही परंतु ९० दिवसांनंतर अर्ज भरल्यास फी भरावी लागेल.
- समुचित प्राधिकाऱ्याच्या आचार संहिते नुसार नवीन नोंदणीसाठी आलेले किंवा, नुतणीकरणासाठी आलेले अर्ज स्वीकारलेल्या दिनांकपासुन ७० दिवसात त्यांचा निपटारा करावा.नियम १८अ (४)(i)
- नोंदणीप्रमाणपत्र फॉर्म ब विहीत नमुन्यात दोन प्रतीत द्यावे.
- नोंदणीप्रमाणपत्र व्यवसायाच्या ठिकाणी ठळक दिसेल अशा जागी मशीनजवळ लावण्यात यावी. कलम १९(४) नियम ६.
- नोंदणीप्रमाणपत्र परस्पर हस्तांतरणीय नाही. केंद्राचा मालक, व्यवस्थापन बदलल्यास वा केंद्र बंद केल्यास नोंदणीप्रमाणपत्राच्या दोन्ही प्रती समुचित प्राधिकाऱ्याकडे सुपूर्द कराव्यात. नियम ६(६)
- मालक वा व्यवस्थापनात बदल झाल्यास नवीन मालकाने वा व्यवस्थापनाने नव्याने अर्ज दाखल करावे. (नियम ६ (७)).
- नोंदणी प्रमाणपत्र दिल्या तारखेपासुन पाच वर्षासाठी लागु राहील. नियम (७)
- समुचित प्राधिकारी यांनी नविन, मंजुर झालेल्या, नुतनीकरणासाठी आलेल्या व्यवस्थापन, मालक, चालक, जागा, पत्ता या बदलासाठी आलेल्या सर्व अर्जाची माहिती वा दस्त कायमस्वरुपात विहित नमुना फॉर्म H नियम (९ (५)) नुसार जतन करावेत.

## फिरत्या वैदयकिय पथकासाठी नोंदणीचे स्वरुप

फिरत्या वैदयकिय पथकाचे नाव, केंद्राचे स्वरुप, कार्यक्षेत्र (जे की जिल्हा क्षेत्राच्या बाहेर नसावे). मोटारगाडीत वापरात असलेल्या, पोर्टेबल मशीनची संख्या, मशीन बद्दलची सविस्तर माहिती (जसे की मॉडल नं., कंपनी, प्रोबची माहिती सिरीयल नं.) फिरत्या वैदयकिय पथकासाठीच्या गाडीचा नोंदणी क्रमांक इत्यादी. नियम ६(२अ) (ब).

फिरत्या वैदयकिय पथकात वापरण्यात येणाऱ्या मशीनचा वाहनामध्येच उपयोग करण्यात यावा, कुठल्याही कारणास्तव उपकरणांचा वापर बाहेर करु नये. हे पोर्टेबल मशीन फिरत्या पथकाचा एकत्रित भाग असावा.

- नोंदणी प्रमाणपत्राची एक प्रत ठळक दिसेल अशा जागी गाडीत लावावी.
- गाडीच्या बिघाडामुळे किंवा तत्सम कारणांमुळे नोंदणीकृत मशीन जनुकीय चिकीत्सेसाठी वापरु शकत नसल्यास तसे समुचित अधिकाऱ्यास ७ दिवसात कळवावे. नियम ६(२अ)(ख)(ग).
- नोंदणी व नुतनी करणाचे सर्व नियम फिरत्या पथकांची नोंदणी वा नुतणीकरणासाठी नियम लागु राहतील.

## नुतनीकरण कसे करावे ?

- प्रत्येक केंद्रांने मुदत संपण्यापुर्वी ३० दिवस आधी नुतनीकरणासाठी अर्ज दोन प्रतीत दाखल करावा.
- नुतनीकरणाची प्रक्रीया ही नवीन नोंदणी प्रक्रीयेसारखीच असेल.नियम ८(२)
- नुतनीकरणाचे शुल्क नवीन नोंदणी शुल्काच्या निम्मे असेल ते केंद्रांच्या स्थितीवर अवलंबुन राहील.नियम ८ (४)
- नवीन नोंदणी प्रमाणपत्र वा अर्ज नाकारल्याचे पत्र मिळाल्यानंतर केंद्रांने आपले जुने प्रमाणपत्र समुचित अधिकाऱ्याकडे सुपुर्द करावे. नियम ८(५)
- अर्जदारास अर्ज केल्यानंतर ९० दिवसात नुतनीकरणाबद्दल काहीही निर्णय अर्जदारास कळविले नसल्यास केंद्राचे नुतणीकरण झाले असे समजावे.नियम ८ (६).

## नोंदणी किंवा नुतनीकरणाचा अर्ज कसा नाकारावा ?

- केंद्र नोंदणी करण्यास पात्र व सक्षम नसल्यास त्या केंद्राचा अर्ज सल्लागार समितीसमोर चर्चेस ठेवावा.
- सल्लागार समितीच्या बैठकीत निर्णय घेतल्यानुसार आणि अर्जदाराने संधी देऊनही आवश्यक त्रुटी पुर्ण केल्या नसल्यास समुचित प्राधिकारी अर्ज नाकारु वा रद्द्बातल ठरवू शकतात तसे अर्जदारास लेखी कळवावे. नियम६ (३)
- अर्ज नाकारल्याचे पत्र फॉर्म क (Annex 5) मध्ये संबंधितास कळविण्यात यावे. फॉर्म क हा नवीन केंद्र नाकारण्यासाठी वा नुतनीकरण नाकारण्यासाठी लागु राहील. नियम ६(३) आणि ८(३) [

## अर्ज व नुतनीकरण शुल्काचा विनियोग कसा करावा?

जनुकीय केंद्र, प्रयोगशाळा, चिकीत्सालय सोनोग्राफी केंद्र इत्यादी, वैयक्तिक वा संस्थेचे अर्जाने निविन वा नुतनीकरणासाठी जमा झालेले अर्जाचे शुल्क हे समुचित प्राधिकाऱ्याच्या पदनामावर असलेल्या बँक खात्यात जमा करण्यात यावे व त्याचा विनियोग हा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी असणाऱ्या तरतुदीसाठी करावा. नियम ५ (२).

## ५) केंद्र तपासणीकरीता मार्गदर्शक तत्वे

### *अनुवंशशास्त्रीय चिकित्सालये, अनुवंशशास्त्रीय प्रयोगशाळा, अनुवंशशास्त्रीय समुपदेशन केंद्र ची तपासणी कशी करावी ?*

तपासणीच्या आधी योग्य नियोजन व तयारी केली असल्याची खातरजमा करावी. समुचित प्राधिकारी किंवा समुचित प्राधिकारी यांच्यावतीने प्राधिकृत केलेले अधिकारी तपासणीच्या वेळी समुचित प्राधिकारी असलेबाबतची अधिसूचनेची प्रत तसेच ओळखपत्र, चिकित्सालया बाबतची आवश्यक सर्व कागदपत्रे जसे B विहीत नमुना, H विहीत नमुना, H विहीत नमुना तसेच चिकित्सालयाने केलेले मागील प्राप्त झालेले पत्रव्यवहार सोबत बाळगावेत.

चिकित्सालयाची तपासणी करतेवेळी खालीलप्रमाणे परिक्षण करावे. (सूचक यादी संपूर्ण नाही) (तपासणी सुविधेकरीता परिशिष्ठ क्र.६ च्या संदर्भाचा आधार घ्यावा.)

- गर्भलिंग निदान करणे कायद्यानुसार प्रतिबंधित आहे. असा मजकूर लिहिलेला फलक इंग्रजी किंवा स्थानिक भाषेमध्ये ठळकपणे प्रदर्शित केलेला असावा. (नियम १७ पोटनियम १ नुसार)
- कायद्याच्या पुस्तकाची प्रत चिकित्सालयाच्या आवारात उपलब्ध असावी आणि (रुग्णाने मागणी केल्यानंतर त्यास उपलब्ध करुन दयावी.) (नियम १७ पोटनियम २ नुसार)
